ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80 Licence No. 175

वर्ष ३२ | पुणे, बुधवार २ फेब्रुवारी, १९६६ | अंक ३

## अन्न स्वावलंबनाची मोहीम यशस्वी करा !



मोहिमेची चार प्रमुख अंगे:

* जास्त उत्पन्न देणाऱ्या संकर बी-बियाण्यांचा वापर
* अन्न पिकांखालील जमिनीस कालव्याच्या पाण्याचा मोफत पुरवठा व उसाच्या लागवडीखालील क्षेत्रात कपात
* गव्हाचे व भाताचे दुबार पीक
* शेतकऱ्यांना सबंध हंगामभर वाजवी किंमतीची हमी

## महाराष्ट्राने आव्हान स्वीकारले

प्रसिद्धी संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई

## विविध माहिती

**रशियाला बुटांची निर्यात**—भारत व रशिया ह्यांच्यांत होणाऱ्या व्यापाराची वाढ करण्यासाठी योजना आखण्यात येत आहेत. त्यास अनुसरून चालू साली भारत रशियाला १० लाख बुटांच्या जोड्या विकणार आहे. रशियाची परराष्ट्रीय व्यापार संघटना आणि भारताचे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ह्यांच्या दरम्यान ९ लाख बूटजोड्या पुरविण्यासंबंधी करार करण्यात आला आहे. आणखी १ लाख बूटजोड्यासंबंधीचा करार लवकरच होईल.

**गोव्यामधील नवे पूल**—गोव्यात मांडवी नदीवर पणजी-नजीक होणाऱ्या पुलाचे बांधकाम १९६७ च्या जूनच्या सुमाराला पूर्ण होऊन तो वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल अशी अपेक्षा आहे. झुआरी नदीवर पुलाच्या कामाला पुढील आर्थिक वर्षात प्रारंभ करण्यात येणार आहे. ४ थ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षात ह्या कामासाठी १५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**अधिक शास्त्रज्ञांना शिक्षण**—चीनचा तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम चालू वर्षी सुरू झाला आहे. ह्या कार्यक्रमाच्या अवधीत संशोधन करणाऱ्या अधिक शास्त्रज्ञांना शिकवून तयार करण्यात येणार आहे. शक्य तर सर्व शास्त्रज्ञांना चीनमधील संस्थांतूनच प्रशिक्षण देण्याचा चीनच्या सरकारचा मानस आहे. तथापि, काही शास्त्रज्ञांना परदेशातून शिक्षणासाठी पाठविण्याची व्यवस्था कायम ठेवण्यात येणार आहे. चीनमध्ये कम्युनिस्टांची राजवट येण्यापूर्वी जितके विद्यार्थी शास्त्रीय विषयांच्या अभ्यासासाठी पाठविण्यात येत असत, त्याच्या ४ पट विद्यार्थी १९५९ सालापासून चीनने शास्त्रीय विषयांकडे वळविले आहेत. १९४९ सालाशी तुलना करता चीन आज ६ पट अधिक शास्त्रीय संशोधक शिकवून तयार करीत आहे.

**सहकारी साखर कारखान्यांपुढे पेच**—नगर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांपुढे फार मोठा आर्थिक पेचप्रसंग उभा राहिला आहे. कारखान्यांच्या गुदामांतून १० कोटी रुपयांची साखर पडून आहे. कारण, खुल्या बाजारात साखर विकण्यास परवानगी देण्यात सरकारकडून दिरंगाई होत आहे. त्याशिवाय साखर विकण्याचे परवाने असलेले व्यापारी मंजूर झालेली साखर भराभर घेऊनही जात नाहीत. त्यामुळे कारखान्यांची आर्थिक कुचंबणा चालू झाली आहे.

**धूम्रपानापासून परावृत्त होण्यासाठी मदत**—धूम्रपानाच्या व्यसनाच्या आधीन गेलेल्या लोकांनी ते सोडण्यासाठी मदत व्हावी म्हणून कार्डिफमधील एका धार्मिक संघटनेने टेलिफोन सर्व्हिसची सोय केली आहे, व्यसनाधीन व्यक्तीने एक ठराविक टेलिफोन नंबर फिरवला तर ह्या व्यसनांच्या घातकपणाबद्दल माहिती देणारी २ मिनिटांची ध्वनिमुद्रिका त्याला ऐकविण्यात येते.

**पोलंड इंजिने पुरविणार**—विशाखापट्टम येथील बोटीच्या कारखान्यासाठी पोलंड सहा बोटींची इंजिने पुरविणार आहे. त्यापैकी पहिले इंजिन ऑक्टोबरमध्ये आणि दुसरे डिसेंबरमध्ये भारतात पाठविण्यात येईल. उरलेली ४ इंजिने १९६७ ऑगस्ट-पर्यंत पाठविण्यात येतील. बोटीच्या इंजिनांच्या बनावटीत पोलंड पुढारलेले आहे.

**सीलोनच्या लोकसंख्येत झपाट्याने वाढ**—सीलोनच्या सरकारने रोजगाराची गरज आणि अन्नपुरवठा ह्या दृष्टीने देशाच्या लोकसंख्येची पाहणी केली असता १९६६ अखेर लोकसंख्या १ कोटी, २५ लाख होईल असे आढळून आले. लोकसंख्येच्या वाढीची सध्याची गतीच कायम राहिल्यास आणखी १० वर्षांनी सीलोनला २ कोटी लोकांची पोटापाण्याची व्यवस्था करावी लागेल.

**निर्यातीसाठी केसांचे संस्करण**—मद्रास राज्यातील तिरूपती आणि पालनी येथे येणाऱ्या यात्रेकरूंनी काढून टाकलेल्या केसांवर संस्करण करून त्यांची अमेरिकेला निर्यात करण्यात येणार आहे. संस्करणासाठी काढावयाच्या कारखान्यासाठी तीन तज्ज्ञ हाँगकाँगहून मद्रासला आले आहेत. केस स्वच्छ करून, त्यांची वर्गवारी करून टोप करण्यासाठी त्यांचा उपयोग करण्यात येणार आहे.

**अणुविस्काराचे भय**—अमेरिकन विमानदलाचे एक मोठे बॉम्बफेकी विमान अण्वस्त्राचे काही भाग घेऊन स्पेनच्या आग्नेय भागावरून उड्डाण करत असता हवेतच इंधन भरण्याच्या प्रयत्नात खाली कोसळले. विमानातील अण्वस्त्रांच्या भागांचा शोध लावण्यासाठी अमेरिकन सैनिक तो प्रदेश धुंडाळीत असता काही स्पॅनिश शेतकऱ्यांनी अमेरिकाविरोधी घोषणा केल्या. विमानातील काही साधनांमुळे अणुविस्कार पसरण्याची भीती घोषणांच्या मुळाशी होती.


## Another Year of Progress

| | | 1964 | | 1965 |
|---|---|---|---|---|
| Capital Paid-up | Rs. | 8,00,000/- | Rs. | 8,00,000/- |
| Reserves | Rs. | 6,12,000/- | Rs. | 7,39,000/- |
| Deposits | Rs. | 2,67,00,000/- | Rs. | 3,21,00,000/- |
| Net Profit | Rs. | 2,38,000/- | Rs. | 2,39,000/- |
| No. of Branches | | 35 | | 38 |

**The Belgaum Bank Ltd., Belgaum.**

Estd. : 1930

Scheduled Bank

Regd. Office : 659-60, Raviwar Peth, Belgaum.

# अर्थ

बुधवार, २ फेब्रुवारी, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आर्थिक विकाससंबंधी अमेरिकन तज्ज्ञाचे मत

अमेरिकेतील मॅसेच्युसेट्स तांत्रिक विद्यालयाचे प्रमुख डॉ. मिलिकन ह्यांनी त्रिवेंद्रम येथे बोलताना अविकसित देशांचा आर्थिक विकास साधण्याच्या करावयाच्या प्रयत्नांच्या स्वरूपावर आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले, की अविकसित देशांच्या विकासाच्या गतीत शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. सध्या ह्या देशांतील शेती मागे पडलेली आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रांतील आर्थिक प्रगतीला अडथळे उत्पन्न झाले आहेत. भारताचे लक्ष सध्या अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यावर केंद्रित झाले आहे. परंतु ह्या बाबतीत अल्पकालापुरता विचार करून चालणार नाही. शेतीसाठी येत्या वीस वर्षांच्या कालापुरता दीर्घ-कालीन कार्यक्रम आखण्यात आला पाहिजे. त्याचे मुख्य उद्दिष्ट शेतीच्या उत्पादनाच्या वेग वाढविण्याचे असले पाहिजे. ह्या बाबतीत करावयाचे प्रयत्न सातत्याने होत राहिले पाहिजेत. चांगल्या अगर वाईट पाऊसपाण्यावर अशा प्रयत्नांचे मोजमाप अवलंबून ठेवता कामा नये. शेती अधिक महत्त्वाची का उद्योग-धंदे अधिक महत्त्वाचे, ह्या प्रश्नाचा सत्य परिस्थिती ओळखणारे काथ्याकूट करीत बसत नाहीत. औद्योगिक वाढ होण्यासाठी शेतीचा विकास झाला पाहिजे हे त्यांनी केव्हाच मान्य केलेले आहे. वास्तविक उत्पादनाचे हे दोन्ही विभाग एकमेकांना पूरक असे आहेत. शेतीचा विकास होऊ लागला, की नवीन खरेदी शक्तीचा उगम होऊ लागतो; आणि त्यामुळे उद्योगधंद्यांच्या विस्ताराला चालना मिळू लागते. उलटपक्षी परंपरागत पद्धतीने करण्यात येणाऱ्या शेतीचा चेहरामोहरा बदलण्याचे काम उद्योग धंद्यांकडून होत असते. आधुनिक पद्धतीची शेती करण्यासाठी उद्योगधंद्यांना पुष्कळ प्रकारचे उत्पादन करावे लागते. शेतीसाठी लागणारी यंत्रसामग्री आणि रासायनिक खते ही ह्याचीच उदाहरणे आहेत.

---

## शास्त्री शांतता पारितोषिकाची सूचना

भारताचे दिवंगत पंतप्रधान श्री. लाल बहादुर शास्त्री ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शास्त्री शांतता पारितोषिक दरसाल देण्यात यावे अशी सूचना राज्याचे मुख्य प्रधान व पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ह्यांनी केली आहे. जागतिक शांततेसाठी महत्त्वाची कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला १ लाख रुपयांचे पारितोषिक देण्यासाठी वेगळा २० लाख रुपयांचा ट्रस्ट उभारण्यात यावा आणि त्याच्या उत्पन्नातून वरील पारितोषिक देण्यात यावे अशी योजना सुचविण्यात आली आहे. सर्व्हंटस् ऑफ पीपल सोसायटीतर्फे हा उपक्रम चालू करण्यात आला आहे. सोसायटीचे चिटणीस श्री. अलगुराय शास्त्री ह्यांनी अशी माहिती सांगितली की, स्वर्गीय श्री. शास्त्री ह्यांच्या स्मारकासाठी एका प्रसिद्ध उद्योगपतीने १० लाख रुपयांची देणगी देण्याची तयारी दाखविली आहे.

## स्वदेशीच्या व्रताच्या पुनरुज्जीवनाची आवश्यकता

नियोजन समितीचे सभासद श्री. एस. जी. बर्वे मुंबई येथे 'आर्थिक स्वावलंबन' ह्या विषयावर बोलताना म्हणाले की, आर्थिक स्वावलंबनाच्या वाटेवर पाऊल टाकण्यासाठी स्वदेशीच्या व्रताचे पुनरुज्जीवन करणे अतिशय अगत्याचे आहे. तथापि, स्वावलंबन ह्याचा अर्थ परदेशांशी असलेले सर्व संबंध तोडून अलग अशी अर्थव्यवस्था निर्माण करणे, असा मात्र नाही. देशातील सर्व नैसर्गिक साधनसंपत्तीचा आणि माणुसबळाचा पुरेपूर उपयोग करून घेणे असा त्याचा अर्थ केला पाहिजे. सध्या देशापुढे उभी टाकलेली अडचणीची परिस्थिती आयात व निर्यात ह्यांच्यांत समतोलपणा साधता न आल्याने निर्माण झालेली आहे. परंतु निर्यातीमुळे प्राप्त झालेल्या परदेशीय चलनाचा उपयोग करून भारताला आयातीची किंमत चुकती करता येऊ लागली म्हणजे परिस्थितीत अनुकूल फरक पडू लागेल. सध्या भारत परंपरागत निर्यातीवर अवलंबून आहे; नव्या उद्योगधंद्यांतून मोठी निर्यात होणे अद्याप शक्य झालेले नाही. पोलादाच्या उत्पादनाच्या बाबतीत भारताने स्वावलंबन जवळ-जवळ गाठले आहे. काही विशेष प्रकारच्या पोलादाच्या आयातीसाठी मात्र अजूनही ८० कोटी रुपये खर्चावे लागतात. आणखी तीन-चार वर्षांच्या अवधीत भारत तेलाच्या बाबतीत ५० टक्के स्वयंपूर्ण होईल. तेल शुद्ध करण्याच्या बाबतीत तर भारत ह्या अवधीत पूर्णपणे स्वावलंबी होईल. सिमेंटचे कारखाने, साखरेचे कारखाने आणि कापड गिरण्या ह्यांना लागणारी यंत्रसामग्री आता भारतातच तयार होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे औषधी कारखान्यांबाबत आणि वाहतुकीच्या साधनांबाबत स्वावलंबनाच्या मार्गावर बरीच प्रगती करण्यात आली आहे. भारतात नव्याने उदयास आलेल्या तरुण तंत्रज्ञांना स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल आत्मविश्वास वाटत असून नियोजन समितीने व सरकारने काही चुका केल्या तरी ते स्वयंपूर्णता गाठू शकतील.

---

## आशिआई विकास बँकेचे भांडवल

आशिआतील देशांच्या आर्थिक विकासाला मदत करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या बँकेचे संकल्पित भांडवल १०० कोटी डॉलर्सचे आहे. त्यांपैकी ९७·२ कोटी डॉलर्स भांडवलाची आश्वासने निरनिराळ्या राष्ट्रांकडून मिळालेली आहेत. आशिआतील देशांनी ६४·२ कोटी डॉलर्सची म्हणजे त्यांच्यासाठी ठरविलेल्या हिश्शापेक्षा ४·२ कोटी डॉलर्स अधिक जमविण्याची खातरजमा दिली आहे. बिगर-आशिआई देशांपैकी अमेरिकेने सर्वांत अधिक म्हणजे २० कोटी डॉलर्स भांडवलाचा भरणा केला आहे. सोव्हिएट रशिआने अद्याप काही भांडवल पुरविलेले नाही. संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या द्वारा आशिआतील देशांचे आर्थिक सहकार्य घडवून आणण्याच्या प्रयत्नातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून ही बँक गणली जात आहे. आशिआंतील देशांतील विकासाची कामे पूर्ण करून तेथील लोकांचे जीवनमान उंचावण्यात तिला महत्त्वाचा वाटा उचलावा लागेल.

# प्रो. वा. गो. काळे.

जन्म : १०-४-१८७६ मृत्यू : २७-१-१९४६

[ अर्थाच्या पहिल्या अंकापासूनचे जाहिरात खात्याचे प्रमुख श्री. द. रा. कुलकर्णी यांची श्रद्धांजली. ]

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कै. प्रोफेसर वा. गो. तथा दादासाहेब काळे दिवंगत झाले, त्याला २७ जानेवारी १९६६ रोजी २० वर्षे पूर्ण झाली. त्यांच्या स्मृतीस वाहिलेली श्रद्धांजली :–

"दादासाहेबांचा आणि माझा पहिला संबंध ......", वगैरे म्हणण्याइतका मी ज्ञानाने आणि वयानेही मोठा नव्हतो. दादासाहेबांच्याकडे मी गेलो ते त्यांच्या मोटारीवर ड्रायव्हर म्हणून, १९३३ साली ३० रु. पगारावर. त्या वेळी ३० रुपयांची किंमत आजच्या कितीतरी पटीने जास्त होती. पण मिळणाऱ्या पगाराची मातब्बरी कधीच वाटू नये असं आयुष्यभर पुरेल इतकं मला मिळालं ते म्हणजे माणुसकी आणि शिस्त !

कुण्याही वक्तशीरानेसुद्धा दादांच्या दिनक्रमावरून आपले घड्याळ खुशाल लावून घ्यावं इतका दादांचा वेळेवर वचक होता. "हे बघ, माझी वेळ सांभाळशील, तरच तुझी नोकरी टिकेल" इतकी परखड जाणीव नोकरीवर ठेवतानाच त्यांनी मला दिली होती. त्या काळी मी विनापाश असल्यामुळे आणि नोकरीही टिकवण्याची धास्ती असल्यामुळे दादांची वेळ कसोशीने सांभाळली. पुढे दादांच्या सहवासात नकळतच हे वेळेचं बंधन माझ्या अंगात इतकं मुरल की आजही मनात आलं तरी एखादी ठरवलेली वेळ मी चुकवू शकत नाही.

कारण नसताना दादांनी मला कधी थांबवून ठेवले नाही. सकाळी ८ वाजता मी बंगल्यावर जात असे, तो साडेअकरा वाजता परत येत असे. या वेळात मोटार क्वचितच बाहेर निघे. त्यांच्याखेरीज विशेष कारणाशिवाय त्यांच्या घरातल्या मंडळींनीही मोटार कधी वापरली नव्हती. "आहे मोटार, तेव्हा हिंडायला काय हरकत आहे ?" असला अनाठायी शौक त्यांनी कधीही जोपासला नाही. फिरायला, सिनेमाला, नाटकाला वगैरे मोटार घेऊन दादा गेल्याचे माझ्या स्मरणात नाही. संध्याकाळी ५ ते ८ ही दिवसातली नोकरीची दुसरी वेळ. सभा वगैरे काही नसेल तर आधीच सुटी मिळत असे.

'फोर्ड' हे दादांचे आवडते मॉडेल. दर तीन वर्षांनी ते कटाक्षाने गाडी बदलत. दुरुस्तीसाठी पैसा खर्च करण्यापेक्षा तो नव्या गाडीच्या खरेदीसाठी अधिक उपयुक्त ठरतो हा त्यांचा अर्थशास्त्रीय विचार असे, आणि त्याची प्रचीतीही तावडतोब येत असे.

अर्थशास्त्र या विषयाला वाहिलेले 'अर्थ' नावाचे साप्ताहिक त्यांनी १९३५ साली सुरू केले. साप्ताहिकासाठी जाहिरात एजंटाची त्यांना आवश्यकता होती. ते काम करण्यास त्यांनी मला सुचविले आणि प्रयत्न म्हणून मीही ते हौसेने स्वीकारले. जाहिरातीच्या कामासाठी मी कधी परगावी गेलो तर त्या दिवसाचा पगार त्यांनी कधी कापला नाही; इतकेच नव्हे तर मी मिळवून आणलेल्या जाहिरातींचे वेगळे कमिशनही मला द्यायला त्यांनी सुरुवात केली.

१९४५ साली सरकारने विनंती करून दादांची मोटार घेतली. मोटार फारच चांगली ठेवली, या कौतुकासाठी ड्रायव्हरला बक्षीस म्हणून सरकारने रु. १०० चा चेक पाठविला. दादांनी तो सानंद माझ्या स्वाधीन केला. सरकारने होती ती मोटार नेली. त्यानंतर दादांनी नवी गाडी घेतली नाही. म्हणजे खऱ्या अर्थाने माझी तिथली नोकरी संपली होती, पण दादांनी मला अंतर दिले नाही. दरमहा ते मला पगार देतच राहिले. 'अर्थ' साप्ताहिकाच्या कामात मी जास्त लक्ष घालू लागलो. त्यात मिळकतही बऱ्यापैकी होऊ लागली. मिळकतीपेक्षाही माझा महत्त्वाचा वैयक्तिक फायदा म्हणजे 'अर्था' मुळे जाहिरातींच्या निमित्ताने माझे बँका व तत्सम संस्थांशी संबंध वाढले, ओळखी वाढल्या. 'अर्थ' आता बत्तिसाव्या वर्षात पदार्पण करत आहे. 'अर्था'वरील जनतेचे प्रेमही पूर्वीसारखेच आहे. 'अर्था'चा उच्च दर्जा कायम ठेवणे आणि इतरही सर्वच बाबतीत संस्थापकांच्या पावलावर पाऊल टाकण्यात आजचे संपादक यशस्वी झाले आहेत हे सर्वमान्य आहे.

दादांचेकडे महाराष्ट्रातली प्रमुख वृत्तपत्रे येत असत. ती मला वाचावयास मिळत. तेव्हापासूनच वाचनाची आणि किंचित लेखनाचीही आवड माझ्यात निर्माण झाली. दादांच्या साठाव्या वर्षी 'प्रभा' साप्ताहिकात माझा पहिला लेख छापून आला होता. तो त्यांना फारच आवडला.

आठवण होते ती दादांच्या मार्गदर्शनाची, की ज्यामुळे पुण्यासारख्या शहरात मी स्थायिक होऊ शकलो, मुलाचे उच्च शिक्षण करू शकलो, स्वतःपुरते स्वतंत्र छोटेसे घर बांधू शकलो. दादांच्या शिकवणुकीची, शिस्तीची व घरगुती वातावरणाची पावलोपावली जाणीव होते. बंगल्यात त्यांच्या नेहमीच्या बसण्याच्या हॉलमध्ये अजूनही त्यांची हालचाल, त्यांचे अस्तित्व भासावे इतकी ही जाणीव ताजी आहे.

अदृश्याची ही जाणीव आणि भासमय अस्तित्व याहिपुढे माझ्या पाठीशी राहील एवढीच इच्छा या निमित्ताने व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्यच समजतो !!


## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] ७, बुगभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०२

( १ ) बचत खाते :—व्याजाचा : दर द. सा. द. शे रु. ४=००

( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध

( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

## विमानाच्या प्रवासाने मनोव्यापार विस्कळित होतात

जेटच्या साह्याने उड्डाण करणारी विमाने वापरात आल्यापासून पृथ्वीवरील समुद्र अगर खंड ह्यांना एकदोन झेपातच ओलांडणारे प्रवास करणे शक्य झाले. अशा जलद प्रवासाचा प्रवाशांच्या शरीरावर व मनावर परिणाम होतो असे शास्त्रज्ञांना आढळून आले आहे. जेट विमानांनी प्रवास करणाऱ्या सगळ्या प्रवाशांना प्रवास संपल्यावर काही काळ अस्वस्थ वाटते हा अनुभव होताच; पण ह्या अनुभवाला आता शास्त्रज्ञांनी दुजोरा दिला आहे. खंडांतर्गत प्रवास करताना प्रवाशांना अनेक कालविभाग ओलांडावे लागतात. प्रवाशांना आपली घड्याळे बरोबर करून घ्यावी लागतात. पण मनगटावरील घड्याळे बरोबर केली तरी शरीराचे व मनाचे घड्याळ असे सहज कार्यक्षम राखता येत नाही. अमेरिकेतील सहा पदवीधरांना पूर्व–पश्चिम व पश्चिम–पूर्व असा दीर्घ प्रवास जेट विमानाने घडविण्यात आला. त्यातील काही गणिताचे पदवीधर होते. जेट विमानाने दीर्घ प्रवास करून खाली उतरल्यावर त्यांच्या मज्जातंतूवरील ताण वाढलेला आढळून आला. त्यांना अधिक प्रमाणावर घाम फुटू लागला आणि दोन आकड्यांच्या संख्येच्या बेरजाहि त्यांना चटकन आणि बिनचूक करणे अशक्य झाल्याचे आढळून आले. अमेरिकेच्या विमानदलाच्या प्रमुखांनी आणि परराष्ट्र खात्याने ह्या परिस्थितीची दखल घेतली असून, परदेशी जाणाऱ्या आपल्या प्रतिनिधींना वाटाघाटीचे काम सुरू करण्यापूर्वी निदान एक दिवस तरी पूर्ण विश्रांती घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. ह्या विश्रांतीनंतर त्यांचे शारीरिक व मानसिक व्यापार नित्याप्रमाणे चालू लागतात. अस्वस्थतेच्या कालात त्यांची निर्णयबुद्धी नीट काम करीत नाही, असे दिसून आले आहे. आणखी काही वर्षांतच आवाजापेक्षाही अधिक गतीने प्रवास करणारी विमाने उड्डाण करू लागतील; आणि मग तर अशा विमानातून केलेल्या प्रवासाचे अनिष्ट परिणाम टाळण्यासाठी अधिक दीर्घ काल विश्रांती घेणे आवश्यक ठरेल.

---

## कच्छचे रण लागवडीस योग्य करण्याचे प्रयत्न

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर सौराष्ट्राच्या उत्तरेस असलेले कच्छचे रण १९६४ च्या उन्हाळ्यात पाकिस्तानच्या आक्रमणामुळे एकदम प्रसिद्धीच्या प्रकाशात आले. एरव्ही शाळकरी मुलांच्या दप्तरात लपलेल्या ह्या भागाची अनेकांनी माहिती करून घेतली. कच्छच्या रणाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ९ हजार चौरस मैल असून मार्चपासून आक्टोबरपर्यंत तेथे समुद्राचे खारे पाणी पसरलेले असते. शिवाय जमिनीवरून वाहात येणाऱ्या छोट्या-मोठ्या जलप्रवाहांचीही त्यात भर पडते. इतक्या मोठ्या प्रदेशाचा उपयोग मात्र नाही. कारण तेथील जमीन क्षारामुळे पिके काढण्यास अयोग्य झालेली आहे. अशा प्रकारची ही जमीन लागवडीखाली आणण्याची आस्था भारत सरकारने दाखविली असून, ह्या कामी काही उच्च तज्ज्ञांचा सल्लाही घेण्यात आला आहे. रणाचा एक भाग छोटे रण म्हणून प्रसिद्ध आहे. त्याकडे प्रथम लक्ष पुरविण्यात येण्याची अधिक शक्यता आहे. कारण मोठे रण व छोटे रण ह्यांच्यामध्ये असलेल्या एका अरुंद समुद्रप्रवाहामुळे छोट्या रणात पाणी शिरते. येथे एखादा बंधारा अगर धरण बांधून समुद्राचे पाणी बाहेरच अडवून धरता येणे शक्य आहे. छोट्या रणाचे क्षेत्रफळ सुमारे १० लाख एकर आहे. नापीक जमीन सुपीक करण्याची आणखी एक पद्धत अमेरिकेने शोधून काढल्याची वार्ता आहे. कच्छच्या रणाचा विकास करणे शक्य झाल्यास त्याला फार मोठे महत्त्व आहे. नापीक असलेल्या ह्या भूभागात शेतीचा चांगला विकास करता येण्यासारखा आहे. कांडला येथील बंदर भागात मुक्त व्यापार विभाग स्थापन करण्यात आलेला आहे. त्यामुळे तेथे नवनवे उद्योगधंदे मूळ धरू लागले आहेत. ह्या औद्योगिक विभागाला लागणारा कच्चा माल विकसित कच्छचे रण पुरवू शकेल.

---

## उत्पादनाच्या तंत्रावर शास्त्रीय ज्ञानाचा फारसा परिणाम नाही

शास्त्रीय आणि औद्योगिक मंडळाने भारतामधील शास्त्रीय विषय घेऊन पदवी घेतलेल्यांची पाहणी करून नोंदणी केली आहे. त्यावरून असे दिसून येते की, शास्त्रांच्या पदवीधरांच्या ज्ञानाचा भारताच्या उत्पादन तंत्रावर फारसा परिणाम झालेला नाही. कोठल्याही प्रगत देशापेक्षा भारतामधील शास्त्रीय विषयांच्या पदवीधरांची संख्या दुपटीने तरी अधिक आहे. ह्याला अपवाद फक्त अमेरिका आणि रशिया ह्या दोन देशांचाच आहे. इतके असून देशातल्या तांत्रिक प्रगतीवर फारसा परिणाम झालेला नाही. अमेरिकेतील शास्त्रीय विषयांच्या पदवीधरांची संख्या २ लाख, ७५ हजार आहे; हिंदमधील २ लाख आहे; इटलीमधील ८५ हजार आहे; ब्रिटनमधील ३० हजार आहे; युगोस्लाव्हिआमधील २० हजार आहे आणि कॅनडामधील १५ हजार आहे., शास्त्रीय विषयांच्या पदवीधरांपैकी सुमारे एक अष्टमांश पदवीधर गेल्या शिरगणतीच्या वेळी बेकार होते. ज्यांना रोजगार होता त्यांपैकी ३५ टक्के लोक तांत्रिक काम करीत होते, ३५ टक्के लोक शिकवण्याचे काम करीत होते आणि ३५ टक्के लोक कोणते तरी बिगर तांत्रिक काम करीत होते. उद्योगधंद्यातील तांत्रिक स्वरूपाची कामे करण्याची संधी १० शास्त्रज्ञांपैकी जास्तीत जास्त एकाला मिळत होती. पण त्यातही विक्री विभाग व कारभार विभाग ह्यात कामे करणारांचा समावेश होता. इतर प्रगत देशांच्या मानाने शास्त्रीय स्वरूपाची कामे करणारांतील भारतामधील एंजिनिअर्सचे प्रमाण फार कमी होते. सध्या सुमारे ४५ टक्के एंजिनिअर्स उद्योगधंद्यातील तांत्रिक काम करीत आहेत. संशोधन आणि विकास कार्यात फारच थोडे एंजिनिअर्स काम करीत आहेत. उद्योगधंद्यांचा फाजील सावधपणा, तरुणांची बेताल महत्त्वाकांक्षा आणि विद्यादानाचे कार्य करणाऱ्या संस्थांचा अलिप्तपणा, ह्या कारणांमुळे वरील परिस्थिती उद्भवली आहे.

---

## मिश्र पोलादाच्या उत्पादनात प्रगती नाही

एंजिनिअरिंगच्या आणि संरक्षण खात्याच्या कारखान्यांना लागणारे मिश्र पोलाद निर्माण करण्याच्या कामी अद्याप प्रगती झालेली नाही. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात कलकत्ता येथे पोलाद निर्मात्यांची एक परिषद बोलाविण्यात आली होती. मिश्र पोलादाच्या बाबतीत स्वयंपूर्णता प्राप्त करून घेण्यासाठी कसून प्रयत्न करण्याची तयारी जमलेल्या उत्पादकांनी त्या वेळी दाखविली होती. परंतु गेल्या तीन महिन्यांतील त्यांच्या कार्याचा आढावा घेता ह्या बाबतीत निराशाच पदरी पडते. मिश्र पोलादाची आयात करावी लागत असल्यामुळे भारताच्या परदेशीय चलनाच्या साठ्यावर दरसाल ६० कोटी रुपयांचा बोजा पडतो. भिलई येथील कारखान्यात विविध कामासाठी लागणारे पोलाद निर्माण करता येईल असा अंदाज होता. पण कारखान्यात अंदाजलेल्या उत्पादनाच्या जेमतेम २५ टक्केच उत्पादन होऊ शकले. शिवाय त्याची किंमतही बाजारातील किमतीपेक्षा ३० टक्क्यांनी जास्त असण्याची शक्यता आहे.

### पश्चिम बंगालमध्ये आत्मघात करण्याच्या प्रवृत्तीत वाढ


पश्चिम बंगालमध्ये आत्महत्या करणारांच्या संख्येत अलीकडे वाढ होत चालल्याचे आढळून आले आहे. १९६५ च्या जून ते नोव्हेंबर ह्या कालात १६९१ व्यक्तींनी आत्मघात करून घेतला. त्याच कालात ७३ जणांनी आत्मघाताचे अयशस्वी प्रयत्न केले. प्रत्येक २॥ तासांच्या अवधीत पश्चिम बंगालमध्ये कोठेतरी कोणी तरी आत्महत्येस प्रवृत्त होतो असा हिशेबही करण्यात आला आहे. आत्महत्या करण्याच्या ह्या प्रवृत्तींत इतकी वाढ कां झाली, असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. आत्महत्येच्या कारणाची मीमांसा करताना सरकारी अहवालात दारिद्र्य आणि बेकारी ह्यांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. पण, जीवनास पूर्णविराम देण्याच्या वृत्तीस इतरही काही कारणे असतात हे नमूद करण्यात आले आहे. आयुष्याचा नाश करून घेण्यास प्रेमभंग आणि कुटुंबातील भांडण ह्यांचाही बराच वाटा आहे. त्याशिवाय परीक्षेतील अपयश आणि मानसिक बिघाड हीही कारणे आहेतच. अलीकडे कलकत्त्यामधील एका कोर्टाने एका म्हाताऱ्या बाईस आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल ताकीद देऊन सोडून दिले. फौजदारी गुन्ह्याच्या कायद्याच्या ३०९ कलमाविषयी ह्या वेळी कोर्टाने असे विचार व्यक्त केले की हे कलम विनोदी आहे. त्या कलमाप्रमाणे आत्महत्येचा गुन्हा पूर्ण केल्यास शिक्षा होत नाही. पण तसा प्रयत्न मात्र गुन्हा ठरतो व त्याबद्दल शिक्षा होते. हे कलम विनोदी तर आहेच पण माणुसकीस सोडूनही आहे. कोर्टाने शेवटी असा प्रश्न केला आहे की असाध्य रोगाने पछाडलेल्या माणसाला जर बरे करता येत नाही, अथवा दुखावलेले हृदय जर दुरुस्त करता येत नाही तर, मरणापेक्षाही भीषण यातना सोसणाऱ्या माणसास जगत राहा असे सांगण्याचा तरी कोणाला काय अधिकार आहे ?

---

### मुलांच्या जननाच्या प्रमाणात घट होत आहे

जगातील लोकसंख्येच्या भयानक वाढीकडे गेल्या काही वर्षांत समाजशास्त्रज्ञांनी अनेकदा लक्ष वेधले आहे. तथापि लोकसंख्येच्या प्रश्नाचा अभ्यास करण्याच्या अनेक रीती आहेत. भारतात डॉ. चंद्रशेखर ह्या प्रश्नाच्या विविध अंगांचा अभ्यास करून मार्गदर्शन करीत असतात. लोकसंख्येच्या प्रश्नाचा विचार करताना एखाद्या समाजात दरहजारी जन्मणाऱ्या मुलांचे अगर मुलींचे प्रमाण काय, ह्याचाही विचार करावा लागतो. समाजातील स्त्री–पुरुषांच्या संख्येत कोणत्याही बाजूने व्यस्त प्रमाण झाल्यास सामाजिक स्थैर्य बिघडण्याचा धोका असतो असे समाजशास्त्रज्ञ म्हणतात. भारतामध्ये जन्म पावणाऱ्या अपत्यांत गेल्या साठ वर्षांच्या अवधीत मुलींचे जनन मुलांच्या जननाच्या मानाने कमी वेगाने होत आहे असे आढळून आले आहे. १९०१ मध्ये हजार जननांत ९७२ मुली जन्मत असत तर १९६१ मध्ये त्यांचे दर हजारी जनन ९४१ झाले आहे. प्रगत देशांतील परिस्थितीच्या उलट अशी ही परिस्थिती आहे, आणि ह्याचे कारण असे आहे की भारतामधील स्त्रीच्या जीवनाला कोणत्याही वयांत इतर देशांतील स्त्रीच्या मानाने अधिक धोका असतो. त्या मानाने पुरुषांच्या जीवनाला धोका कमी असतो. भारतात मुलींकडे लहान वयापासूनच मुलांच्या मानाने अधिक दुर्लक्ष करण्यात येते. परंपरा, आर्थिक महत्त्व, वंशसातत्याची कल्पना इत्यादी अनेक कारणे ह्याला जबाबदार असू शकतील. स्त्रियांचे जननक्षमतेचे वय सामान्यत: १५ ते ३४ पर्यंत असते. ह्या काळांत प्रसूतिवेदनांमुळे अकाली मृत्यू येण्याचा संभव बराच असतो. त्याचाही परिणाम स्त्रियांच्या संख्येवर होतो.

ठाकरसी फॅब्रिक्स
फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती; सॅन्फोराइज्ड कापड •SANFORIZED•
THACKERSEY FABRICS
ठाकरसी शर्टिंग म्हणजे रुबाबदार कापड
डिझाइनचे किंवा साधे, हवी त्याची करा निवड
ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स •दी क्राउन स्पिनिंग ॲन्ड मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.
•दी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. •दी हिंदुस्तान स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग मिल्स कं. लि.


BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

## १९६४–६५ मधील आयुर्विम्याचे काम

भारताच्या आयुर्विमा मंडळाने १९६४–६५ साली १४·४४ लाख विमा पॉलिसी उतरल्या. एकूण विमापत्रकांपैकी १०·४२ लाख विमे ज्या लोकांनी प्रथमच आयुष्याचा विमा उतरला अशा लोकांचे आहेत. भारतात देण्यात आलेल्या एकूण विमा पॉलिसींच्या संख्येशी हे प्रमाण ७२·६ टक्के पडते. मंडळाने मिळविलेल्या विम्याच्या एकूण कामापैकी ५·२० लाख पॉलिसी अथवा भारतात देण्यात आलेल्या पॉलिसींच्या ३६·२ टक्के पॉलिसी ग्रामीण भागातील लोकांनी उतरलेल्या होत्या. त्या सर्वांची मिळून दर्शनी किंमत १९७ कोटी रुपये आहे. विमेदारांची वैद्यकीय तपासणी न करता पॉलिसी देण्याच्या योजनेप्रमाणे ५·९० लाख पॉलिसी देण्यात आल्या. त्यांची दर्शनी किंमत १४५ कोटी रुपये आहे. नव्याने मिळविण्यात आलेल्या कामाशी अशा कामाची टक्केवारी २१ टक्के पडते. १९६५ अखेर मंडळाच्या चालू विम्यांची दर्शनी किंमत ३,८८७ कोटी रुपये होता. विमा पत्रकांची संख्या १०८·६८ लाख होती. त्यामागील साली मंडळाच्या चालू विम्यांची दर्शनी किंमत ३,५७१ कोटी रुपये होती व एकूण विमापत्रकांची संख्या १०३·२८ लाख होती. विमानिधीची रक्कम गेल्या वर्षाच्या मार्चअखेरपर्यंत ९०१·६१ कोटी रुपयांची होती. विमानिधीमध्ये ९३·२४ कोटी रुपयांची भर पडलेली आहे. घरबांधणीच्या योजनांसाठी राज्य सरकारांना कर्जे देण्याचे मंडळाने चालू ठेवले आहे. राज्य सरकारकडून सहकारी घरबांधणीच्या संस्था, व्यापारी कंपन्या आणि इतर निम-सार्वजनिक संस्था ह्यांना कर्जे मिळावी म्हणून आयुर्विमा-मंडळ राज्य सरकारला कर्ज देत असते.

## डोळ्यांचे आरोग्य व आहार

मध्यवर्ती सरकारच्या आरोग्यमंत्री डॉ. सुशिला नय्यर ह्यांनी डोळ्यांच्या आरोग्याचा आहाराशी असलेल्या संबंधाकडे लक्ष वेधले आहे. अंधत्वविरोधी राष्ट्रीय संघटनेने योजलेल्या परिसंवादात त्या बोलत होत्या. डोळ्याचे काही रोग असे असतात की त्यांच्यामुळे अखेरीस अंधत्व प्राप्त होते. त्यांपैकी काही रोग तरी योग्य आहार घेतल्यास थांबविता येण्यासारखे असतात. जागतिक आरोग्य संघटनेने गोळा केलेल्या माहितीप्रमाणे जगातील अंधांची संख्या सुमारे १ कोटी असून त्यांपैकी ४५ लाख लोक भारतात आहेत. भारतात देवीसारख्या रोगाने हजारो लोकांचे डोळे निकामी होतात. अंधांपैकी ६० ते ८० टक्के लोकांची दृष्टी निकस आहारामुळे गेलेली असते हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. आहारातील जीवनसत्त्वांच्या पुरवठ्यामुळे डोळ्यांचे रोग होण्याची शक्यता नाहीशी होते. शहरापेक्षा ग्रामीण भागात डोळ्यांचे रोग व अंधत्व ह्यांचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून येते. ह्याचे एक कारण असे सांगता येईल की, खेड्यातील लोक परंपरेने चालत आलेल्या आहाराच्या संवयी बदलण्यास तयार होत नाहीत. तथापि प्रचाराने त्यांच्या संवयी बदलता येणे अशक्य नाही. ह्या बाबतीत दुसऱ्या महायुद्धानंतर जपानने केलेल्या कार्याचा कित्ता गिरविण्यासारखा आहे. जपानच्या लोकांनी सरकारच्या प्रचाराला साथ देऊन डोळ्यांचे आरोग्य उत्तम साधले आहे. भारतामधील ग्रामीण भागातील लोकांच्या दृष्टिदोषाबाबत पश्चिम बंगालमध्ये पाहणी करण्यात आली असता असे आढळून आले की, २५ टक्के लोकांचे आहार सदोष असतात. त्यामुळे त्यांना डोळ्यांचे रोग होतात आणि पुष्कळांना तर डोळे कायमचे गमावून बसावे लागतात.


राष्ट्रीय आणीबाणीचे प्रसंगी संरक्षणाची दुसरी आघाडी : शेती व उद्योग मजबूत करण्याचे दृष्टीनें सक्रीय प्रयत्न करणारी औरंगाबाद जिल्ह्यातील एकमेव सहकारी संस्था

# औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

टेलिफोन नंबर ४५३
पोस्ट बॉक्स नंबर ३

## औरंगाबाद

तारेचा पत्ता
सहकार बँक

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात

–बँकेची सर्वसामान्य·माहिती ३१ ऑगस्ट ६५–
(आकडे लाखांत)

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ५६=६१ |
| गंगाजळी व इतर निधी | रु. ५=६१ |
| खेळतें भांडवल | रु. ५७४=८३ |
| एकूण ठेवी | रु. १७८=४१ |
| एकूण दिलेलीं कर्जें | रु. ४७४=२९ |

— ठेवींचे दर —

| | |
|---|---|
| चालू खाती | ½ टक्का |
| सेव्हिंग्ज खाती | ४ टक्के |
| मुदती ठेवी | ३½ ते ७ टक्के |

वर दर्शविलेल्या ठेवीवरील आकर्षक व्याजाचे ठेवीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. बँकेत ठेवी ठेऊन आपणसुद्धा वरील व्याजाच्या दराचा लाभ घ्यावा ही विनंती.

हेड ऑफिस : गांधी चौक – औरंगाबाद

शाखा :—जालना, वैजापूर, सिल्लोड, कन्नड, पैठण, गंगापूर, भोकरदन, टेंभुर्णी, सोयगांव, अंबड, जाफ्राबाद, खुल्ताबाद, फुलंब्री, लासूर स्टेशन, वडीगोद्री, पाचोड, बनोटी, बदनापूर, नायद, पारध, शिवुर, औराळा, बिडकीन, पिशोर, भराडी, औरंगाबाद तालुका, अजिंठा, रांजणी, घनसावंगी.

डी. ए. कुलकर्णी, बी. ए., एच. डी. सी.,
मॅनेजर.

रा. चिं. पाटील, एम. एल. सी.
चेअरमन.

### ऑस्ट्रेलियाचे वर्णभेदावर आधारलेले धोरण

कातडीच्या रंगावर आधारलेले वर्णभेदाचे धोरण अमेरिकेतील दक्षिणेकडील संस्थानातून जारी आहे. दक्षिण आफ्रिका तर उघडउघड काळ्यागोऱ्यांच्या बाबतीत भेदभावाचे धोरण अमलांत आणीत आहे. ब्रिटनमध्ये सुद्धा काहीसा प्रच्छन्नपणे वर्णभेद पाळला जातोच. तथापि ऑस्ट्रेलियात नुकत्याच घडलेल्या एका प्रकरणाने तेथील छुपा वर्णभेद जगाच्या नजरेसमोर आला आहे. ऑस्ट्रेलियातील न्यू साऊथ वेल्स राज्यातील एका शिक्षणसंस्थेत फिजीमधील एका हिंदी स्त्रीने शिक्षकाचा अभ्यासक्रम पुरा केला. त्यानंतर तिने न्यूगिनीमध्ये शिक्षिकेच्या एका जागेसाठी अर्ज केला. ह्या जागेसाठी लागणारी लायकी असतानासुद्धा सदर शिक्षिकेचा अर्ज नाकारण्यांत आला. अर्ज नाकारण्याचे कारण असे देण्यात आले की, ऑस्ट्रेलियाचे नागरिकत्व मिळविण्यास ती पात्र नव्हती. ह्याचा स्पष्ट अर्थ इतकाच की, ती गोऱ्या वर्णाची नव्हती म्हणून तिच्याबाबत भेदभाव करण्यात आला. वास्तविक न्यूगिनी हा भूभाग ऑस्ट्रेलियाचा नाही, किंवा ऑस्ट्रेलियाची वसाहतही नाही. हा भाग संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या विश्वस्त समितीच्या व्यवस्थेखाली असून ऑस्ट्रेलियाचे सरकार संघटनेच्या विश्वस्त-समितीच्या वतीने तेथील कारभार पाहात असते. म्हणजे, ऑस्ट्रेलियाच्या अधिराज्याखाली नसलेल्या भागातही वर्णभेदाचे धोरण त्या सरकारने अमलांत आणले आहे. ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या थोडी असल्याने बाहेरच्या जगांतील लोक तेथे कायमची वस्ती करण्यांस येतील तर ते पाहिजे आहेत. परंतु हे लोक आशियातील अगर आफ्रिकेतील म्हणजेच गौरेतर असून चालणार नाही. ऑस्ट्रेलियाचे पुढारी तेथे वर्णभेदाचे अस्तित्व नसल्याचे सांगत असले तरी देशाबाहेरून येणाऱ्या लोकांच्या आगमनाबद्दल व कायम वस्तीबद्दल जे कायदे करण्यात आलेले आहेत ते वर्णभेदाला पाठिंबा देणारेच आहेत.

---

### जर्मनीच्या सहकार्याने नमुनेदार शेती

हिमाचल प्रदेशात मंडी ह्या ठिकाणी जर्मन शेतीतज्ज्ञांच्या सहकार्याने एका नमुनेदार शेतवाडीची स्थापना करण्यात आली आहे. ह्या वाडीसाठी पश्चिम जर्मनीकडून सल्लामसलत तर देण्यात येत आहेच; परंतु आधुनिक तऱ्हेची यंत्रसामग्रीही पुरविण्यात येत आहे. शेतवाडीवर ७ जर्मन शेतीतज्ज्ञ गेली तीन वर्षे राहात आहेत. त्याशिवाय जर्मन शांतिदलाचे काही कार्यकर्तेही त्यांच्याबरोबर खपत आहेत. शेतीवर ३०० भारतीय तज्ज्ञही राबत आहेत. शेतवाडीत पूर्वी दरसाल सरासरी १४ टन रासायनिक खताचा वापर करण्यात येत असे, तेथे आता १,४०० टनांचा वापर करण्यात येत आहे. खताचा वापर कसा करावा ह्यासंबंधीची प्रात्यक्षिके जर्मन तज्ज्ञ स्वतः निरनिराळ्या शेतांवर जाऊन करून दाखवीत असतात. ह्या शेतवाडीसाठी पश्चिम जर्मनीकडून नुकतीच काही यंत्रसामग्री देण्यांत आली आहे.

---

सोने जमविण्यासाठी फिरत्या गाड्या—लोकांना सुवर्णरोख्यात पैसे गुंतविण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सरकारने फिरत्या मोटार गाड्यांची सोय करण्याचे ठरविले आहे. ह्या गाड्या देशाच्या निरनिराळ्या भागांत फिरविण्यात येणार आहेत. ह्या गाड्यांत लोकांकडून सोने घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. स्टेट बँक ह्या कामी त्या त्या ठिकाणी मदत करणार आहे.


**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**
**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | ११.६९ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १६.०७ ,, |
| ठेवी | ... | रु. | ४४७.०० ,, |
| खेळते भांडवल | ... | रु. | ४८६.०० ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.




महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**
विश्रामबाग - सांगली ( महाराष्ट्र )

## बोकॅरो कारखान्याविषयी तपशीलवार अहवाल

बोकॅरो येथे उभारण्यात यावयाच्या चौथ्या पोलादाच्या कारखान्याच्या उभारणीसंबंधीचा तपशीलवार अहवाल रशियन तंत्रज्ञांनी सादर केला आहे. हिंदी तज्ज्ञांची एक कमिटी कलकत्ता येथे अहवालाचा समग्र अभ्यास करण्यात सध्या गुंतली आहे. अहवाल बराच विस्तृत असून त्याची ३०० प्रकरणे आहेत. भारतामधील आर्थिक परिस्थिति व भारताच्या आर्थिक गरजा ह्यांची छाननी अहवालात सहानुभूतीने पण वस्तुनिष्ठ पद्धतीने करण्यात आली आहे. अहवालाचे परिशीलन केल्यावर काही पोलाद व धातुतज्ज्ञांनी असे मत व्यक्त केले आहे की, बोकॅरो येथील कारखाना उच्च दर्जाची तांत्रिक व आर्थिक कामगिरी पार पाडेल, अशा रीतीने त्याची आखणी करण्यात आली आहे. कारखान्यापासून सरकारला चांगला नफा सुटण्याची अपेक्षा आहे.

---

## दक्षिण भारतात खनिज तेलाचा आढळ ?

तेल आणि नैसर्गिक वायुमंडळाने कावेरी नदीच्या खोऱ्यात तेलाच्या शोधासाठी खोल विहिरी खोदण्याचे काम चालू केलेले आहे. आतापर्यंत झालेल्या कामाने तेल सापडण्याबाबत उत्साहजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. कराइकल येथे खोदण्यात आलेल्या पहिल्याच खोल विहिरीत तेलाचा मागोवा लागला आहे. तथापि तेथील संभाव्य तेलाचा साठा व्यापारी प्रमाणावर उपसण्यासारखा आहे, असे आजच म्हणता येत नाही. खोदकामात उपलब्ध झालेल्या भूगर्भीय थरावरून ह्या भागात तेल सापडण्याची शक्यता बरीच वाढली आहे, असे मात्र म्हणता येईल. खोदकाम १५०० मीटर पर्यंत गेल्यावर तेल असलेले भूथर लागले. १७०० मीटरपर्यंत खोलीवर नैसर्गिक वायूच्या प्रमाणात वाढ झाल्याचे आढळले. तेलाच्या साठ्याची ही मोहीम रशियन तंत्रज्ञांच्या सल्ल्याने चालली.

---

## मुंबई येथे ४ कोटींचे मोठे होटेल

अमेरिकेतील हिल्टन ह्या प्रसिद्ध उद्योगपतीबरोबर सहकार्य करून मुंबईमधील काही उद्योगपती ४ कोटी रुपये खर्च येणारे एक मोठे होटेल बांधण्याचा विचार करीत आहेत. ह्या योजनेला भारत सरकारची लवकरच मान्यता मिळण्याची शक्यता आहे. सहकार्याचा जो करार करण्यात येईल, त्यात ठोक नफ्यापैकी ३३ टक्के नफा हिल्टन कंपनीला देण्यात यावा आणि कंपनीने त्यावर ६० टक्के प्राप्तीवरील कर द्यावा अशी तरतूद करण्यात येणार आहे. होटेल चालू झाल्यावर त्यापासून दरसाल ३० ते ४० लाख डॉलर्स परदेशीय चलन मिळेल अशी अपेक्षा आहे. त्यापैकी २ लाख हिल्टन कंपनीला परदेशी नेता येतील. टाटा कंपनीही एका अमेरिकन होटेल कॉर्पोरेशनशी करार करून मुंबईत एक व कलकत्त्यात एक अशी दोन मोठी होटेल्स काढण्याच्या प्रयत्नात आहे.

---

**संततिप्रतिबंधक साधनांचा कारखाना**—संततिनियमनाची रबराची साधने तयार करणारा भारतामधील पहिला मोठा कारखाना मद्रासजवळ स्थापन करण्यात आला आहे. त्याच्या उभारणीसाठी १२ लाख रुपये खर्च आला आहे. ब्रिटनमधील एका कंपनीच्या सहकार्याने भारतीय उद्योगपतींनी तो काढला आहे. कारखान्यात दरसाल ३·७ कोटी रुपयांची साधने तयार करता येतील.

## चित्रमयजगत् काश्मीर युद्ध विशेषांक

चित्रमयजगत्चा ५७ व्या वर्षाचा १ ला अंक काश्मीर युद्ध विशेषांक म्हणून प्रसिद्ध झाला आहे. श्री. देवगिरीकर ह्यांनी आपल्या लेखात ("दुसरे पाकिस्तानी युद्ध") पाकिस्तानने भारतावर लादलेल्या युद्धाचे सविस्तर समालोचन केले आहे. प्रा. डॉ. प्र. चिं. शेजवलकर ह्यांनी 'आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून काश्मीर' ह्या आपल्या लेखात भारताच्या भूमीकडे इतर देश स्वतःच्या दृष्टिकोनातून कसे पाहतात, हे दाखविले आहे. प्रा. द. वि. बडवे ह्यांनी आधुनिक युद्धातील प्रक्षेपित अस्त्रांची माहिती दिली असून श्री. श्री. बा. काळे ह्यांनी भारतातील युद्ध साहित्याच्या निर्मितीची तपशीलवार माहिती दिली आहे. इतरही अनेक उद्बोधक लेख व चित्रे ह्यामुळे अंक वाचनीय व संग्रहणीय झाला आहे. (संपादक : रा. प्र. कानिटकर. पृ. ८० किं. १ रु.)

---

## जर्मन अणुशास्त्रज्ञांचे यश

पश्चिम जर्मनीतील अणुशास्त्रज्ञांनी प्रयोगशाळेत सूर्याच्या तपमानाइतकी उष्णता निर्माण करण्यात यश मिळविले आहे. हैड्रोजन वायू ६ कोटी सेंटिग्रेड अंशापर्यंत तापविण्याचे त्यांना जमले आहे. प्रयोगशाळेत कृत्रिमरीत्या एवढी उष्णता निर्माण करण्याचे अद्यापपर्यंत कोणालाही साधलेले नाही. ह्या यशस्वी प्रयोगामुळे हैड्रोजन बॉंबच्या स्फोटावर नियंत्रण ठेवून वीज निर्माण करणे लवकरच शक्य होईल असा दावा शास्त्रज्ञांनी केला आहे. हैड्रोजन बॉंबच्या स्फोटावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न अमेरिका, ब्रिटन व रशिया ह्या देशांमधील शास्त्रज्ञही करीत आहेत. पण अद्याप त्यांना यश आलेले नाही. नव्या प्रकारच्या वीजकेंद्रात युरेनिअम अगर प्लूटोनिअम ह्यांची जरूरी लागणार नाही. सूर्यावर पैदा होणारी शक्ती हैड्रोजन बॉंबच्या स्फोटासारख्या प्रक्रियेनेच उत्पन्न होत असते.

---

## चहाच्या उत्पादनात बरीच घट

चहाच्या उत्पादनात आणि निर्यातीत खूप घट झाल्याची वार्ता चहाच्या व्यापारी वर्तुळातून आली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधीत ३७·६५ कोटी किलोग्रॅम चहाचे उत्पादन करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. प्रत्यक्ष उत्पादन मात्र १·१ कोटी किलोग्रामने कमी होणार आहे. गेल्या काही वर्षांतील चहाच्या निर्यातीने उपलब्ध होणाऱ्या परदेशीय चलनाचा सरासरी आकडा १२५ कोटी रुपयांचा आहे. त्याच्याशी तुलना करता १९६५ साली सुमारे ९ कोटी रुपयांचेच परदेशीय चलन उपलब्ध होईल असे दिसते. भारताच्या ईशान्य कोपऱ्यातील चहाच्या मळ्यांतील उत्पादन कमी झाले आहे. दक्षिण भारतामधील चहाच्या मळ्यांतून मात्र उत्पादन वाढले आहे.

---

**अमेरिका रणगाडे पाठविणार**—न्यूयॉर्क टाइम्सने प्रसिद्ध केलेल्या माहितीप्रमाणे व्हिएटनाममधील युद्धात अमेरिका प्रथमच रणगाड्यांची एक तुकडी पाठविणार आहे. ह्या तुकडीमध्ये मध्यम वजनाचे ७२ रणगाडे असतील आणि ते व्हिएटनामच्या मध्यवर्ती पठारावर होणाऱ्या युद्धात भाग घेणार आहेत. ह्या युद्धात चिलखती तुकडीचा इतक्या मोठ्या प्रमाणावर वापर अद्याप झालेला नाही.

**तागाच्या विकासासाठी मंडळ**—तागाच्या धंद्याचा विकास घडवून आणण्यासाठी भारत सरकारने एका मंडळाची स्थापना केली आहे. मंडळावर ताग पिकविणारे शेतकरी, व्यापारी आणि उद्योगपती ह्यांचे प्रतिनिधी घेण्यात आले आहेत ताग व इतर प्रकारचे धागे देणाऱ्या पिकांबाबत मध्यवर्ती व राज्य सरकारांनी ज्या योजना आखल्या असतील त्यांची पाहणी मंडळ करील व सल्ला देईल.

**लष्कराने वापरलेली वाहने**—गेल्या वर्षी ५ ऑगस्टला अगर त्या नंतर लष्कराने अनेक मुलकी वाहनांचा वापर आपल्या कामासाठी केला. पाकिस्तान व भारत ह्यांच्यात झालेल्या संघर्षात अनेक मुलकी वाहतुकीची साधने नष्ट झाली. त्यापैकी ज्या वाहनांचा विमा उतरलेला नव्हता अशांच्या वापराबद्दल नुकसानभरपाई देण्याची एक योजना भारत सरकारने मंजूर केली आहे.

**लष्करी मदत सुरू होणार ?**—भारतामधील बिघडलेली अन्नपरिस्थिती लक्षांत घेऊन अमेरिका भारताला काही विशेष मदत देण्यास प्रारंभ करील अशा वार्ता आहेत. त्याचप्रमाणे भारत–पाकिस्तान संघर्ष सुरू झाल्यानंतर थांबविण्यांत आलेली लष्करी मदतही पुन्हा सुरू करण्याचा विचार अमेरिका करीत आहे. ताश्कंद येथील जाहीरनाम्यावर सह्या झाल्याबरोबर ह्याही प्रश्नासंबंधी हालचाली सुरू झाल्या आहेत.

**काजूगरांच्या निर्यातीत वाढ**—भारतामधून होणाऱ्या काजूगरांच्या निर्यातीमुळे गेल्या ९ महिन्यांत २·३८ रुपयांचे जादा परदेशी चलन मिळाले. गेल्या वर्षांच्या ह्याच कालखंडातील निर्यातीचे उत्पन्न १९ कोटी, २६ लाख रुपयांच्या आसपास होते. १९६५ च्या ९ महिन्यातील निर्यातीचे उत्पन्न २१ कोटी, ८५ लाख होते. भारताकडून काजूगरांची आयात करणाऱ्या देशांत अमेरिकेचा अनुक्रम पहिला लागतो.

**इतिहासज्ञाचा इषारा**—ब्रिटनमधील एका प्रसिद्ध इतिहासज्ञाच्या मताने युरोप व अमेरिकेतील मोठ्या शहरांतून एखाद्या नव्या हिटलरचा अगर स्टॅलिनचा उदय होण्याची शक्यता आहे. अशा मोठ्या शहरांतून अशाश्वतीच्या वातावरणात कायमचे जिणे कंठणाऱ्या लोकांची गर्दी वाढत असून त्याचा अनिवार्य परिणाम अशा घटनेत होण्याची निश्चिती त्यांनी आपल्या एका लेखात व्यक्त केली आहे.

**हौशी प्रवाशांची अधिक सोय**—हौशी प्रवाशांच्या धंद्याला उत्तेजन देण्यासाठी काश्मीरच्या सरकारने ३४ लाख रुपये खर्च येणारा एक कार्यक्रम आखला आहे. ह्या कार्यक्रमात अधिक प्रवाशांची सोय करणे आणि सध्या असलेल्या सुखसोयीत वाढ करणे ह्या गोष्टींना प्राधान्य देण्यात आले आहे. जुन्या डाकबंगल्यात असलेल्या राहण्याच्या सोयी वाढविण्यात येणार असून काही नवे बंगलेही बांधण्यात येणार आहेत.

**बर्फातील घसरगुंडीसाठी व्यवस्था**—पाश्चात्त्य देशात बर्फ पडणाऱ्या ठिकाणी बर्फातील घसरगुंडी खेळण्याची व्यवस्था असते. भारतात अशी व्यवस्था नाही. सिमल्यापासून ७ मैलांवर कुफ्री ह्या ठिकाणी बर्फातील घसरगुंडीचा आखाडा उघडण्यांत येणार आहे. ह्या जागेची पाहणी एका इटालियन तज्ज्ञाने केली आहे. त्याच्या मते काश्मीरमधील गुलमर्गपेक्षा कुफ्री हे ठिकाण बर्फक्रीडेसाठी अधिक अनुकूल आहे.

**जुन्या नकाशांना मागणी**—अमेरिकेतील जुन्या वस्तू जमविणाऱ्यांत सध्या भारताचे जुने नकाशे जमविण्याची लाट पसरली आहे. अर्थात इतर देशांच्या जुन्या नकाशांनाही मागणी आहे. तथापि, भारताचे जुने नकाशे फारसे उपलब्ध नाहीत. १८०० मध्ये तयार करण्यात आलेल्या दोन नकाशांची किंमत ५० रुपये झाली. १८४२ साली तयार केलेल्या कलकत्त्याच्या जुन्या नकाशाला मात्र अधिक किंमत आली.

**नेपाळची पहिली सरकारी बँक**—नेपाळमधील सरकारी मालकीच्या पहिल्या व्यापारी बँकेचे उद्घाटन राजे महेंद्र ह्यांनी केले. लवकरच सर्व नेपाळमध्ये बँकेच्या शाखा निघणार आहेत. बँक भारताच्या स्टेट बँकेच्या धर्तीवर स्थापन करण्यात आली असून तिचे भांडवल १ कोटी नेपाळी रुपये आहे. भारतीय रुपयांत भांडवल ६२ लाख रुपये होईल.

**इंदूर शहराच्या पाणीपुरवठ्यात कपात**—इंदूर शहराच्या पाणीपुरवठ्याची सोय करण्यासाठी कॉर्पोरेशनने आपल्या अंदाजपत्रकात १·३० कोटी रुपयांची सोय केली आहे. गेल्या वर्षी अपुरा पाऊस झाल्यामुळे इंदूरच्या पाणीपुरवठ्यावर बराच वाईट परिणाम झाला आहे. शहराची वस्ती ५ लाखांच्या जवळपास असून इतक्या लोकांना रोज ११० ते १२० लाख गॅलन पाण्याची आवश्यकता आहे. पण, पाण्याच्या अपुऱ्या साठ्यामुळे आता रोज फक्त ३५ लाख गॅलन पाणीच पुरविण्यात येणार आहे. पाण्याच्या टंचाईवर तात्पुरते उपाय योजण्यासाठी कॉर्पोरेशनने १० लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे.

**कॅमेऱ्यांच्या साह्याने प्राण्यांची 'शिकार'**—आफ्रिका हा देश वन्यपशुपक्ष्यांसाठी प्रसिद्ध आहे. जगातील अनेक देशांतील शिकारी ह्या प्राण्यांची शिकार करण्यासाठी आफ्रिकेत जातात. अलीकडे मात्र बंदुकीने प्राण्यांची शिकार करण्यापेक्षा कॅमेऱ्याच्या साह्याने प्राण्यांना टिपणारे हौशी प्रवासी वाढत आहेत. कीनीयामधील सरकारने ह्या शोकाला उत्तेजन दिले आहे. वन्यपशुपक्ष्यांना त्यामुळे अधिक संरक्षण मिळाले आहे.

---

**गरज शोधाची जननी–पैसा**

वरील विषयावर शुक्रवार दि. ४ रोजी श्री. श्री. वा. काळे ह्यांचे भाषण नभोवाणीच्या पुणे केंद्रावरून सायंकाळी ६–१० ते ६–२५ ध्वनिक्षेपित होणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.